**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

- प्रधानमंत्री उद्या पीएम किसान सन्मान निधीच्या २१व्या हप्त्याचं वितरण कोईमतूर इथं करणार

- आंध्रप्रदेशात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत माओवादी कमांडर हिडमा मडावी याच्यासह सहा नक्षली ठार

आणि

- गाझापट्टीत शांतता आणि पुनर्निर्माणासाठी अमेरिकेच्या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत मंजुरी

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते  राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली इथं आज झालेल्या सोहळ्यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्कारनं गौरवण्यात आलं. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. या विभागात गुजरातला द्वितीय तर हरियाणाला तृतीय पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. याशिवाय उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम पुरस्कार पटकावला.

अमृताइतक्याच मौल्यवान असलेल्या जल संसाधनाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्वांचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे, अशी भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केली. भारतीय परंपरेमधे जलस्त्रोतांना पूजनीय मानलं गेलं आहे. माणूस अन्नाशिवाय काही काळ जगू शकेल, मात्र पाण्याशिवाय जगू शकत  नाही, त्यामुळे पाण्याच्या संवर्धनासाठी काम करणारे कौतुकास पात्र आहेत, असं राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्यावर्षी सुरू झालेल्या जलसंवर्धन जनसहभाग उपक्रमाद्वारे ३५ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचना उभारल्या गेल्या असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितलं.

**- - होल्ड बाईट राष्ट्रपती - -**

देशात मर्यादित जलस्रोत असल्याने त्याचा वापर जपून करायला हवा असं राष्ट्रपती म्हणाल्या. हवामान बदलाचा जलस्रोतांवर परिणाम होत असून जलस्रोतांच्या संवर्धनसाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावं असं आवाहन यावेळी राष्ट्रपतींनी केलं.

या कार्यक्रमात केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील, जलशक्ती राजमंत्री व्ही. सोमन्ना आणि राजभूषण चौधरी उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात दहा विभागांमधे ४६ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या पीएम किसान उत्सव दिवसानिमित्त किसान सन्मान निधीच्या २१व्या हप्त्याचं वितरण करतील. तमिळनाडूत कोईंबतूर इथं मुख्य कार्यक्रमात प्रधानमंत्री देशातल्या ९ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मिळून १८ हजार कोटी रुपये जमा करतील.

प्रधानमंत्री नरेंद्रमोदी उद्या आंध्रप्रदेश आणि तमिळनाडूच्या दौऱ्यावर जाणार आहेत. आंध्रप्रदेशात पुट्टपार्थी इथं श्री सत्य साईबाबांच्या समाधीला ते भेट देतील. श्री सत्यसाईबाबांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारं टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन मोदी यांच्या हस्ते होईल.

तमिळनाडूमधे नैसर्गिक शेतीविषयीचं एक चर्चासत्र तिथल्या कृषी उत्पादक मंचानं आयोजित केलं आहे. त्याला प्रधानमंत्री उपस्थित राहतील.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज चौथी अर्थसंकल्पपूर्व बैठक भांडवली बाजारातल्या प्रतिनिधींसोबत घेतली. या बैठकीत अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, अर्थ मंत्रालयाचे सचिव आणि केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन उपस्थित होते. अर्थमंत्रालय दरवर्षी अर्थसंकल्पापूर्वी तज्ञ, उद्योगपती, अर्थतज्ञ आणि अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत असतं. यावर्षीही केंद्रीय अर्थमंत्री विविध क्षेत्रातल्या तज्ञ व्यक्तींसोबत बैठका घेत आहेत.

<><><><><>

भारताचं प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्र सर्वात वेगानं वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक ठरलं असून २०३० पर्यंत शंभर अब्ज अमेरिकी डॉलरचा टप्पा पार करेल, असा अंदाज

आहे. गेल्या दशकभरात या क्षेत्राचं अर्थव्यवस्थेतलं योगदान सातत्यानं वाढत असून मूल्यवर्धन आणि रोजगारनिर्मिती या दोन्हीत या क्षेत्राचा मोठा हातभार लागत आहे.

<><><><><>

बिहारमधे भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज पाटणा इथ होत आहे. नुकत्याच झालेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाचे ८९ आमदार निवडून आले आहेत. या बैठकीत बिहारचे भाजप पर्यवेक्षकही सहभागी होतील अस बिहार भाजपचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनी सांगितल. संयुक्त जनता दल पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक उद्या होण्याची शक्यता असून त्यानंतरच एनडीए आघाडीच्या घटक पक्षांच्या आमदारांची एकत्र बैठक होण्याची शक्यता आहे. काल पाटणा इथं राष्ट्रीय जनता दलाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक झाली. त्यामध्ये तेजस्वी यादव यांची विधि मंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली.

दरम्यान, येत्या गुरुवारी पाटणा इथल्या गांधी मैदानावर, मुख्यमंत्री आणि नवीन सरकारचा शपथविधी समारंभ होणार असून त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतले महत्वाचे नेते उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

आंध्र प्रदेशात सुरक्षा दलांसोबत आज झालेल्या चकमकीत माओवादी कमांडर हिडमा मडावी याच्यासह सहा नक्षली मारले गेले. हिडमा याच्यावर एक कोटी रुपयांचं इनाम होतं. अनेक हिंसक कारवायांमधे हिडमाचा सहभाग असल्याचं पोलिसांनी सांगितलं. ठार झालेल्यांमधे हिडमा मडावीची पत्नी राजे हिचाही समावेश आहे. आंध्र प्रदेशामधल्या अल्लुरी सितारामा राजू जिल्ह्यात आज सकाळी सहा ते सातच्या दरम्यान, सुरक्षा दल आणि नक्षलींमधे चकमक झाली. त्यानंतर या परिसरात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू असल्याचं पोलीस महासंचालक हरिश कुमार गुप्ता यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितलं.

<><><><><>

दिल्लीतल्या लाल किल्ला स्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल श्रीनगरमधून जसीर बिलाल वनी याला अटक केली. या बॉम्बस्फोटासाठी तांत्रिक मदत जसीर वनी यानं केल्याचा आरोप एनआयएनं केला आहे. त्यानं ड्रोन्स विकसित करून बॉम्बस्फोटापूर्वी त्या ठिकाणी मारा केला, असं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे. या कटाचा तपास करण्यासाठी विविध

बाजूंनी तपास केला जात असून, वेगवेगळ्या राज्यात शोधमोहीम राबवून या दहशतवादी हल्ल्यातल्या आरोपींचा शोध घेतला जात असल्याचं एनआयनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालयानं आज दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात अल फलाह समूहाशी संबंधित २५ ठिकाणी शोधमोहिमा राबवल्या. आर्थिक अनियमितता, बनावट कंपन्यांचा वापर यासह इतर प्रकरणी ही कारवाई करण्यात आली. सध्या अल फलाह समूहाशी संबंधित असलेल्या आणि एकाच पत्त्यावर नोंद असलेल्या नऊ बनावट कंपन्यांचा तपास सुरू असल्याची माहिती सक्तवसुली संचालनालयानं दिली. दिल्लीत लाल किल्ल्याजवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या स्फोटानंतर अटक करण्यात आलेल्या अनेक डॉक्टरांचा अल फलाह विद्यापीठाशी संबंध असल्याचं समोर आल्यानंतर या कारवाईला वेग आला आहे.

<><><><><>

गाझापट्टीत शांतता प्रस्थापित करणं आणि उद्ध्वस्त झालेल्या भागांचं पुनर्निर्माण करण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं मंजुरी दिली आहे. या १५ सदस्यीय परिषदेत १३ जणांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केलं तर रशिया आणि चीनने मतदानात सहभाग घेतला नाही. या प्रस्तावानुसार आता शांतता समितीची तसंच आंतरराष्ट्रीय स्थैर्य दलाची स्थापना केली जाईल. शांतता समितीचं अध्यक्षपद आपण भूषवणार असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं.  आंतरराष्ट्रीय स्थैर्य दलामधे विविध देशांचे सैनिक असतील. यात मुस्लिमबहुल देशांच्या सैनिकांचाही समावेश असेल. हे सैनिक गाझामधे तैनात करण्यात येतील. तसंच मदत आणि बचाव साहित्य गरजूंपर्यंत पोहोचेल याची काळजी घेतली जाईल, असं संयुक्त राष्ट्रातले अमेरिकेचे राजदूत मायकल वॉल्टज यांनी सांगितलं.

<><><><><>

बांगलादेशच्या माजी प्रधानमंत्री शेख हसीना यांना दिलेल्या फाशीच्या शिक्षेला संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी विरोध केला आहे. कोणत्याही परिस्थितीत संयुक्त राष्ट्रांची भूमिका मृत्युदंडाच्या विरोधातच राहील, असं त्यांच्या प्रवक्त्यांनी दैनंदिन वार्ताहर परिषदेत सांगितलं. हा निकाल म्हणजे गेल्या वर्षी सरकारविरोधी आंदोलन

करणाऱ्यांविरुद्ध झालेल्या हिंसाचार पीडितांसाठी महत्त्वाचा क्षण आहे, असं मत संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क संघटनेनं व्यक्त केलं.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलनं शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल यांना फाशीची शिक्षा सुनावण्याच्या निर्णयाचा निषेध केला आहे.

<><><><><>

नागालँडमधे दरवर्षीप्रमाणे हॉर्नबिल म्हणजेच धनेश पक्षी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. येत्या १ ते १० डिसेंबर दरम्यान किसामा आणि कोहिमा इथं हा महोत्सव होणार असून यंदा युनायडेट किंगडम आयोजनात भागीदाराची भूमिका बजावणार आहे.

<><><><><>

इजिप्तमध्ये सुरू असलेल्या जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा ऑलिंपिकपटू गुरप्रित सिंग यानं पुरुषांच्या २५ मीटर पिस्तुल गटात रौप्य पदक पटकावलं. जागतिक स्पर्धेतलं गुरप्रितचं हे दुसरं रौप्यपदक आहे.

//<><><><><>//